जालना
लोकप्रश्न
dainiklokprashna@gmail.com
अंक २८७ वा ■ शुक्रवार दि. २० नोव्हेंबर २००९ ■ पाने - ६ ■ किंमत १.५० रु.

# मुंबईत औद्योगीक व्यापार महामेळाव्याचे आयोजन

*मुंबई/वार्ताहर*

हॅनोवर मिलानो फेअर्स इंडिया या कंपनीने यंदा मुंबईत 'मेगा इंडस्ट्रियल ट्रेड फेअर' अर्थात औद्योगिक व्यापार महामेळाव्याचे आयोजन केले आहे. दि.१० ते १३ डिसेंबर दरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर (बीईसी), पश्चिम द्रूतगती महामार्ग, गोरेगांव (पू.) येथे आयोजित या महामेळाव्यात सीईएमएटी इंडिया (मटेरियल्स हँडलिंग अ‍ॅण्ड लॉजिस्टिक्स), (मोशन, ड्राईव्ह अ‍ॅण्ड ॲटोमेशन), इंडिस्ट्रियल ॲटोमेशन इंडिया (प्रोसेस अ‍ॅण्ड प्रोडक्शन ॲटोमेशन अ‍ॅण्ड इंडस्ट्रियल बिल्डींग ॲटोमेशन), एनर्जी इंडिया (सोल्यूशन्स फॉर एनर्जी एफिशिएन्सी, रिन्युएबल एनर्जी अ‍ॅण्ड कॅप्टीव्ह पॉवर प्लान्टस) ही चार प्रमुख प्रदर्शने भरवली जातील.

*(पान २ वर...)*

## मुंबईत औद्योगीक

अत्याधुनिक तंत्रज्ञान हे या महामेळाव्याचं प्रमुख आकर्षण आहे. फ्लुईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियातर्फे या महामेळाव्यात ॲटोमेशन किऑस्क उभारण्यात येणार आहे. फ्लूईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियाच्या सदस्य औद्योगिक संस्थांनी या महामेळाव्यात ॲटोमेशन तंत्रज्ञान आणि ऑप्लिकेशन ट्रेनिंग संदर्भात माहिती देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. महामेळाव्यात सहभागी होणाऱ्यांना तज्ज्ञांशी थेट संपर्क साधता येणार आहे. ॲटोमेशन किऑस्क ही एक अनोखी संकल्पना असून यापूर्वी जगात कुठेही या संकल्पनेचा वापर करण्यात आलेला नाही. याशिवाय लेन्झ कंपनीने तयार केलेला ८४०० फ्रिक्वेन्सीचा नवीन इन्व्हर्टर, ओमाला कंपनीचे ॲक्चूएटर्स आणि व्हाल्व्स, पीटर्स इंडू प्रोडक्ट कंपनीचे न्यूमॅटिक, हायड्रॉलिक, सेन्सर अ‍ॅण्ड ॲटोमेशन प्रोडक्ट, केबल ॲडाप्टर, सेन्सर कनेक्टर एम ८/एम१२ कनेक्टर मोल्डेड, सेन्सर कनेक्टर एम ८/एम १२ फिल्ड ॲटॅचेबल, इलेक्ट्रॉनिक प्रेशर स्विच इत्यादी स्टॅबिलस, सेन्टॉर्क, ॲटॉस स्पा कंपनीचे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत इलेक्ट्रोहायड्रॉलिक्स आदींचा या महामेळाव्यात समावेश असेल. पुरवठादार आणि ग्राहक कंपन्या या दोहोंनाही उद्योग जगतातल्या नवनवीन ट्रेंडसच्या माहितीची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने हा मेळावा अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे.